# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:29.05.2026** **वारः शुक्रवार**

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची दिल्लीत चर्चा
2. आगामी विधान परिषद निवडणुकीत सर्व जागा जिंकण्याचा महायुतीला विश्वास
3. देशातील प्रत्येक घुसखोराला हद्दपार करणार-केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचा पुनरुच्चार
4. सीबीएसईच्या बारावीच्या परीक्षेचं पुनर्मूल्यांकन करण्याची केंद्रीय शिक्षण मंत्र्यांची घोषणा आणि
5. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त देशभरातून अभिवादन

**मुख्यमंत्री-पंतप्रधान**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल राजधानी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सदिच्छा भेट घेतली. मुख्यमंत्र्यांनी या बैठकीत राज्याच्या विकासाच्या विविध प्रकल्पांबाबत पंतप्रधानांशी चर्चा केली. महाराष्ट्रात सध्या सुरू असलेल्या विविध महत्त्वाकांक्षी आणि पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांची सद्यस्थिती आणि त्यांच्या प्रगतीबाबत फडणवीस यांनी पंतप्रधानांना सविस्तर माहिती दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट नेहमीच अत्यंत प्रेरणादायी आणि सकारात्मक ऊर्जा देणारी असते, अशी भावना मुख्यमंत्र्यांनी या भेटीनंतर व्यक्त केली.

**एकनाथ शिंदे**

विधान परिषदेच्या 17 जागांसाठी महायुती एकजुटीनं निवडणूक लढवणार असून सर्व 17 जागांवर आम्हाला विजय मिळेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. ते काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत बोलत होते. महायुतीमध्ये कोणतेही मतभेद नसल्याचं स्पष्ट करत जागावाटप सन्मानानं होईल, असं शिंदे यांनी सांगितलं. जागावाटपाचं सूत्र स्पष्ट असून महायुती मजबूत आहे, आम्ही एकत्र काम करत आहोत आणि महाराष्ट्राचा विकास साधत आहोत, असं शिंदे म्हणाले. सरकार मराठा समाजाच्या प्रश्नांबाबत संवेदनशील असल्याचं शिंदे यांनी स्पष्ट केलं. 'एक देश, एक कायदा' हे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचं स्वप्न समान नागरी कायद्याच्या माध्यमातून लवकरच पूर्ण होईल, अशी आशा शिंदे यांनी व्यक्त केली.

**आठवले-यवतमाळ**

महायुतीमध्ये रिपाईचं महत्व कमी झालं असल्याची खंत केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी काल यवतमाळमध्ये पत्रकारांशी बोलताना व्यक्त केली. सरकारमध्ये एखादा मंत्री रिपाईचा असायला हवा होता असं आठवले म्हणाले. विदर्भात उन्हाचा पारा प्रचंड वाढला आहे, तापमानावर अभ्यास करण्यासाठी एखादी समिती सरकारने नेमावी, त्यामध्ये विदर्भाचा विशेष विचार व्हावा, अशी मागणी आठवले यांनी केली.

**अमित शहा**

देशातील प्रत्येक घुसखोराला शोधून काढून हद्दपार करण्यासाठी केंद्र सरकार कटिबद्ध आहे, असा पुनरुच्चार केंद्रीय गृह मंत्री अमित शाह यांनी केला आहे. गुजरातमधील गांधीनगरमध्ये एका जाहीर सभेला संबोधित करताना शहा म्हणाले....

**घुसपैठिए को देश के बाहर निकालना ये हमारी सरकार का संकल्प है, और इसके लिए नरेन्द्र मोदी जी ने एक डेमोग्राफी चेंज कमीशन कमेटी बनाने का निर्णय किया है। ये हाई पावर कमेटी देश भर में जनसांख्यिकी का जो कृत्रिम बदलाव हुआ है, उसके कारणों और उपायों की भी चिंता करेगी और इसके लिए कोई कानून बनाने की जरूरत है। तो इसकी भी चिंता करे।**

स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जयंतीनिमित्त, शहा यांनी त्यांच्या सर्वोच्च बलिदानाचा आणि मातृभूमीप्रती असलेल्या आजीवन समर्पणाचा उल्लेख आदरपूर्ण उल्लेख केला.

**<u>सावरकर जयंती-नाशिक, रत्नागिरी</u>**

प्रखर राष्ट्रभक्त स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त काल त्यांना देशभरात अभिवादन करण्यात आलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नवी दिल्लीत स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून विनम्र अभिवादन केलं.

सावरकर यांच्या जन्मगावी भगूर इथं त्यांना अभिवादन करण्यासाठी काल नागरिकांनी गर्दी केली होती. जयंतीनिमित्त भगूरमध्ये काल शोभायात्राही काढण्यात आली. स्वातंत्र्यवीर सावरकरांची कर्मभूमी असलेल्या रत्नागिरीतही पतितपावन मंदिरात, तसंच शहरातल्या त्यांच्या पुतळ्याला विविध संस्था-संघटनांच्या वतीनं पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आलं.

पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयाच्या वसतीगृहातील सावरकरांचं वास्तव्य असलेली खोली काल खुली करण्यात आली होती. त्या ठिकाणीही काल अनेक नागरिकांनी अभिवादन केलं. राज्यभरात अनेक ठिकाणी व्याखानं, सांगीतिक कार्यक्रम, निबंध स्पर्धांच्या माध्यमातून सावरकर यांच्या कार्याचं स्मरण करण्यात आलं.

**<u>सीबीएसई-पुनर्मूल्यांकन</u>**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ अर्थात सीबीएसई च्या इयत्ता 12 च्या परीक्षा मूल्यांकन प्रक्रियेसंदर्भात काही त्रुटी समोर आल्यानंतर आता पुनर्मूल्यांकन प्रक्रिया सुरू केली जाणार असल्याची माहिती केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी काल नवी दिल्लीत दिली. सीबीएसई अधिकाऱ्यांसमवेत झालेल्या बैठकीनंतर प्रधान प्रसारमाध्यमांशी बोलत होते. कोणत्याही विद्यार्थ्याच्या शंका अनुत्तरित राहणार नाहीत आणि सर्व स्तरांवर उत्तरदायित्व सुनिश्चित केलं जाईल. आपण त्रुटींची जबाबदारी स्वीकारत असून या त्रुटी दूर केल्या जातील आणि योग्य तोडगा काढला जाईल, असं प्रधान म्हणाले. ऑन-स्क्रीन मार्किंग ही प्रणाली सीबीएसईनं देशात प्रथमच लागू केली आहे. ओएसएम प्रक्रियेद्वारे सीबीएसईनं जवळपास 40 कोटी स्कॅन केलेल्या पानांचं प्रथमच मूल्यांकन केलं आहे. ओएसएम प्रणालीमुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या उत्तरपत्रिकांच्या स्कॅन केलेल्या प्रती थेट पाहता येतात. ही प्रणाली प्रगत असली, तरी या प्रणालीतील त्रुटी आणि इयत्ता 12 वीच्या पुनर्मूल्यांकन पोर्टलमधील तांत्रिक अडचणी समोर आल्या असल्याचं प्रधान यांनी मान्य केलं. पुनर्मूल्यांकन प्रक्रियेदरम्यान या सर्व तक्रारींचं निवारण केलं जाईल, याबद्दल त्यांनी विश्वास दाखवला.

**<u>बकरीईद</u>**

ईद-उल-अजहा अर्थात बकरी ईदचा सण धार्मिक उत्साह, श्रद्धा आणि बंधुभावाच्या वातावरणात काल देशभरात साजरा करण्यात आला. इदगाह आणि मशिदींमधून मुस्लीम बांधवांनी सामूहिक नमाज अदा केली.

**<u>सीयूईटी</u>**

बकरी ईदमुळे पुढे ढकलण्यात आलेल्या, पदवीपूर्व अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीच्या सीयूईटी- यूजी या परीक्षेचं सुधारित वेळापत्रक राष्ट्रीय चाचणी संस्थेने काल जाहीर केलं. या परीक्षा आता 31 मे, तसंच 6 आणि 7 जून रोजी घेतल्या जातील. 31 मे रोजी होणाऱ्या परीक्षेसाठीची प्रवेशपत्रं प्रसिद्ध करण्यात आली आहेत; ती cuet.nta.nic.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करता येतील, अशी माहिती संस्थेनं दिली आहे.

**<u>अकरावी प्रवेश</u>**

राज्यात इयत्ता अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेसाठीची पहिली यादी आज सकाळी 11 वाजता जाहीर करण्यात येणार आहे. राज्यातल्या सर्व कनिष्ठ महाविद्यालयांसाठी माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण विभागाकडून ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येत आहे. या प्रवेशासाठी राज्यभरातून 12 लाख 51 हजार विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.

**<u>नांदेड विद्यापीठ-प्रवेश</u>**

नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या पदव्युत्तर पारंपरिक अभ्यासक्रमासाठी, ज्या महाविद्यालयांना शैक्षणिक आणि प्रशासकीय लेखापरीक्षण ऑनलाईन तपासणीमध्ये 40 टक्क्यांपेक्षा कमी गुण म्हणजेच 'F' दर्जा मिळाला आहे, अशा 29 महाविद्यालयांमधील प्रथम वर्षाचे प्रवेश थांबविण्याचे आदेश विद्यापीठानं दिले आहेत. हा निर्णय केवळ पारंपरिक पदव्युत्तर

अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांनाच लागू राहणार असून व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांना या कारवाईतून वगळण्यात आलं आहे.

**कोकण रेल्वे**

आगामी मॉन्सूनमध्ये कोकण विभागातील मुसळधार पाऊस आणि अवघड भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी कोकण रेल्वेनं व्यापक पावसाळी पूर्वतयारी केली आहे. गाड्यांच्या वेगावर नियंत्रण ठेवण्यात येणार असून 15 जून ते 20 ऑक्टोबर या कालावधीत विशेष पावसाळी वेळापत्रक लागू राहणार असल्याची माहिती कोकण रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी सुनील बी. नरकर यांनी दिली. प्रवाशांनी प्रवास सुरू करण्यापूर्वी गाड्यांच्या आगमन आणि प्रस्थान वेळांची खात्री करून घ्यावी, असं आवाहनही त्यांनी केलं आहे.

**माओवादी-गडचिरोली**

गडचिरोली जिल्ह्यात गडचिरोली-छत्तीसगड राज्याच्या सीमेवरील जंगलातून नक्षलवाद्यांनी जंगलात सुरु केलेला शस्त्र निर्मितीचा कारखाना काल उद्ध्वस्त करण्यात आला. अलीकडेच 'ऑपरेशन अंतिम प्रहार' अंतर्गत आत्मसमर्पण केलेल्या नक्षलवाद्यांनी दिलेल्या माहितीनुसार गडचिरोली आणि छत्तीसगड पोलिसांनी संयुक्तरित्या ही कारवाई केली. जंगलात स्फोटके लपवून ठेवली असल्याची आणि शस्त्रे तयार केली जात असल्याची माहिती त्यांनी दिली होती. मागील आठवड्यात भामरागड तालुक्यातील बिनागुंडानजीकच्या जंगलातूनही असाच शस्त्रनिर्मितीचा कारखाना पोलिसांनी उदध्वस्त केला होता.

**नासरापूर**

नसरापूर अत्याचार आणि हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी भीमराव कांबळे याच्या विरोधात न्यायालयाने आरोप निश्चित केले आहेत. या प्रकरणाची सुनावणी आता रोज 'इन कॅमेरा' पद्धतीने होणार असल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे. घटनेनंतर अवघ्या पंधरा दिवसांत पोलिसांनी दोषारोपपत्र दाखल केलं होतं. त्यावर काल सुनावणी पार पडली.

**बशीरबद्र-निधन**

प्रख्यात शायर बशीर बद्र यांचं काल भोपाळमध्ये वृद्धापकाळानं निधन झालं. ते 91 वर्षांचे होते. उर्दू शायरीला एक नवी ओळख बद्र यांनी दिली. सामान्य माणसाच्या मनाला भावतील, भिडतील अशी साधी सोपी रचना हे बद्र यांच्या शायरीचं वैशिष्ट्य होतं. 'उजाले अपनी यादोंके' हा त्यांचा गझल संग्रह विशेष गाजला. बद्र यांना पद्मश्री बरोबरच संगीत नाटक अकादमी सन्मानानं गौरवण्यात आलं होतं. त्यांच्या 'आस' या संग्रहाला उर्दू भाषेतील साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला होता.

**हवामान**

राज्यात कोकण आणि विदर्भात कमाल तापमानात सरासरीच्या तुलनेत लक्षणीय वाढ झाली आहे, कोकण आणि विदर्भात उष्णतेची लाट येण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. राज्यात तुरळक ठिकाणी हलका पाउस पडण्याचा अंदाजही वर्तवण्यात आला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.